**महाराष्ट्र शासन – सार्वजनिक आरोग्य विभाग**

**राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी कार्यालय,**

डॉ. नायडू सांसर्गिक रुग्णालय आवार, केनेडी रोड, पुणे -४११ ००१

सत्यमेव जयते

| | |
|---|---|
| **डॉ.मधुकर शि.पवार**<br>उपसंचालक आरोग्य सेवा (आमाजिआ)<br>तथा उपमुख्य निबंधक<br>(जन्म व मृत्य) महाराष्ट्र राज्य | कार्यालय ☎ :- ०२० - २६०५९५३०<br>मा.सं. विभाग ☎ :- ०२० - २६०५८६१०<br>फॅक्स क्र. :- ०२० - २६०५८२९२<br>ई-मेल crs_d83@yahoo.com |


**परिपत्रक** **क्रं.७**

जा.क्र.आमाजिआ/कक्ष-८ ३/मार्गदर्शन/2722-2881/१५

दिनांकः- 13 /5 /२०१५

प्रति,

१) जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा निबंधक जन्म-मृत्यु
जिल्हा परिषद ........... (सर्व)

२) आरोग्य अधिकारी तथा निबंधक जन्म-मृत्यु
महानगरपालिका ............ (सर्व)

३) कार्यकारी आरोग्य अधिकारी तथा निबंधक जन्म-मृत्यु,
बृहन्मुंबई महानगरपालिका, परेल, मुंबई.

४) कार्यकारी अधिकारी तथा निबंधक, जन्म-मृत्यु,
कॅन्टोनमेंट बोर्ड............ (सर्व)

विषय :- जन्म-मृत्यू, उपजत मृत्यू नोंदणी करताना व जन्म-मृत्यू प्रमाणपत्र वितरीत करताना आधार कार्डाचा (UID) नंबर समाविष्ठ करणेबाबत.

संदर्भ :- १) या कार्यालयाचे पत्र क्रं.आमाजिआ/कक्ष-८१/७९२०-७९५४/१४, दिनांक २५/११/२०१४.

२) श्री. आर.एम.भोसले, सहाय्यक संचालक, संचालक सेन्सस ऑपरेशन, महाराष्ट्र मुंबई यांचे दिनांक २२/०४/२०१५ चे पत्र.

३) मा.श्री. दिपक रस्तोमी, भारताचे अतिरिक्त निबंधक जनरल यांचे पत्र दिनांक ०१/०४/२०१५.

कृपया उपरोक्त विषयाबाबत या कार्यालयाचे संदर्भ क्रं.१ चे अवलोकन करावे तसेच ORGI नवी-दिल्ली यांचे पत्र दिनांक २२/०८/२०१४, २८/१०/२०१४ व दिनांक ०७/११/२०१४ अन्वये जन्म, उपजत मृत्यू, मृत्यू नोंदणी नमुन्या मध्ये तसेच जन्म-मृत्यू प्रमाणपत्रा मध्ये आधार कार्ड (UID) नंबर (असल्यास) समाविष्ठ करणेबाबत सूचित केले आहे.

उपरोक्त प्रकरणी मा.सुप्रीम कोर्ट, यांनी दिलेल्या निर्देशानुसार केंद्र व राज्यामध्ये आधार कार्ड (UID) नंबर नाही म्हणून कोणतीही जन्म-मृत्यू (सेवा) नोंदणी नाकारता किंवा टाळता येणार नाही.

आपल्या कार्यक्षेत्रात जन्म, उपजत मृत्यू व मृत्यू यांची नोंदणी तसेच जन्म आणि मृत्यू प्रमाणपत्र वितरीत करताना आधार कार्ड (UID) नंबर नाही म्हणून कोणाचीही नोंद अथवा प्रमाणपत्र नाकारले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

सोबत - संदर्भ क्रं.२ व ३ च्या पत्राची झेरॉक्स प्रत जोडली आहे.

उपसंचालक आरोग्य सेवा<br>
तथा उपमुख्य निबंधक जन्म-मृत्यु<br>
महाराष्ट्र राज्य पुणे-१

प्रत सादर -

मा.श्री. आर.एम.भोसले, सहाय्यक संचालक, निदेशालय, जनगणना कार्यालय, एक्सचेंज बिल्डींग, २रा मजला, सर शिवसागर रामगुलाम मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई-४००००१.

मा. संचालक, आरोग्य सेवा तथा मुख्य निबंधक जन्म-मृत्यु, महाराष्ट्र राज्य, मुंबई-१.

प्रत - १) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) जिल्हा परिषद, .......... (सर्व)<br>
२) गट विकास अधिकारी तथा अप्पर निबंधक जन्म-मृत्यू, पंचायत समिती......... (सर्व)<br>
३) उपसंचालक, आरोग्य सेवा, परिमंडळे .......... (सर्व)